# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र





०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in



जा.क्र. ५८५ /जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र, पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा दिनांक ३१/०१०/२०१८


## लोहपुरुष सरदार वल्लभाई पटेल जयंती व इंदीरा गांधी पुण्यतिथी

**भंडारा:**— पोलीस नियंत्रण कक्ष भंडारा येथील प्रांगणात आज दि. ३१/१०/२०१८ रोजी मा. पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहू यांचे मार्गदर्शनात अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह) यांच्या अध्यक्षतेखाली लोहपुरुष सरदार वल्लभाई पटेल व इंदीरा गांधी याची पुण्यतिथी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन जयंती व पुण्यतिथी साजरी करण्यात आली. त्यांचे जिवण चारीत्र्य व कार्यप्रणालीबाबत माहीती देण्यात आली.

लोहपुरुष यांचे नाव— सरदार वल्लभाई जव्हेरभाई पटेल जन्मस्थान करमसद, जि. खेडा(गुजरात) जन्म — ३१ ऑक्टोबर १८७५ आई — लाडबाई मृत्यु — १५ डिसेंबर १९५० शिक्षण— इ. स. १९०० वकीलीची परिक्षा उत्तीर्ण व १९१३ मध्ये लंडनहुन बॅरीस्टरची पदवी संपादन करुन भारतात परत. कार्य— १९१६ मध्ये त्यांनी राष्ट्रीय कॉग्रेसच्या अधिवेशनात गुजरातचे प्रतिनीधीत्व केले व १९१७ मध्ये खेडा'' सत्याग्रहात भाग घेतला आणि १९२८ मध्ये बारडोलीला आपल्या नेतृत्वाखाली **''साराबंदी चळवळ''** उभी केली व त्याठिकाणी शेतक—यांनी त्यांना **''सरदार''** हा बहुमान दिला. नंतर ते १५ ऑगस्ट १९४७ मध्ये स्वांतत्र्याच्या पहिल्या मंत्रीमंडळात उपपतप्रंधान राहिले. वल्लभभाईने आपली कामगीरी मोठया नेटाने व धैर्याने पार पाडले. असा कनखर वृत्तीचा थोर पुरुष **३१ आक्टोबर** रोजी जन्मास आला. त्याच्या कनखर वृत्तीमुळे त्यांना भारताचे ''लोह पुरुष'' म्हटले जाते. त्यांना नागपुर विद्यापिठ, बनारस हिंदू विद्यापिठ आदि विद्यापिठाकडून ''डी लिट'' ही मा ाची पदवी मिळाली व १९७१ मध्ये त्यांना मरणोत्तर **''भारतरत्न''** बहाल करण्यात आले. सरदार, भारताचे लोहपुरुष भारताचे एकीकरणाचे थोर शिल्पकार स्वतंत्र भारताचे पहिले उपपंतप्रधान, गृहमंत्री अशा या थोर पुरुषाची १४३ वी जयंती साजरी करण्यात आली.

इंदीरा फिरोज गांधी जन्मस्थान— अलाहबाद(उत्तर प्रदेश) जन्म— १९ नोव्हेंबर १९१७ वडील— जवाहरलाल मोतीला नेहरु आई— कमला नेहरु, मृत्यु— ३१ ऑक्टोंबर १९८४ शिक्षण— अलाहाबाद, पूणे, मुंबई कलकत्ता या ठिकाणी त्याचे शिक्षण झाले व उच्च शिक्षणासाठी इंग्लमध्ये 'ऑक्सफोर्ड विद्यापिठात' प्रवेश घेतला. पण काही कारणास्तव पदवी न मिळविता भारतात त्या परत आल्या. विवाह इ. स. १९४२ मध्ये फिरोज गांधी यांचे सोबत विवाह झाला. कार्य— इंदीराजी यांनी सन १९३० मध्ये वयाच्या १३ वया वर्षापासुन राजकारणात भाग घेवुन ल्हान मुलांची **'वानर सेना'** तयार केली व सन १९४२ मध्ये **''चले जाव ''** आंदोंलनात भाग घेवुन तुंरूगवास भोगला आणि १९६४ मध्ये नेहरूजींच्या मृत्यु नंतर लाल बहादुर शास्त्री हे भारताचे पहीले पंतप्रधान बनले त्या नभोवाणी खात्याच्या मंत्री राहील्या व शास्त्रीजींच्या निधनानंतर १९६६ मध्ये भारताच्या पहील्या महिला पंतप्रधान मान त्यांना मिळाला १९७१ मध्ये त्यांनी **''गरीबी हटाओ ''** **ही घोषणा** दिली व त्याच काळात त्यांना **''भारतरत्न''** या सर्वोच्च नागरी सन्माण

प्रदान करून गौरव केला. त्या भारताच्या पहील्या महिला पंतप्रधान १८ वर्ष राहील्या त्यांची पुण्यातीथी राष्ट्रीय संकल्प दिन म्हनुन साजरा करण्यात आला. राष्ट्रीय एकता दिवसा निमीत्त शपथ घेण्यात आली

यावेळी कार्यक्रमाला पोलीस निरीक्षक. मानकर स्थागुशा भंडारा, पोलीस निरीक्षक गाडे वानीशा भंडारा, पोलीस निरीक्षक पाटील मोटार परिवहन विभाग सपोनी. हत्तीमारे जिवीशा,पोउपनि आडोळे दोषसिध्द्‌ी भंडारा, पोउपनी पंधरे श्वान पथक भंडारा, पोउपनी. माळी बि. स. विभाग भंडारा, पोलीस मुख्यालय, पोलीस शाखेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

(जितेद्रं के आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.